Vol II Issue II Dec 2012I

ISSN No : 2249-894X

## Monthly Multidisciplinary Research Journal

# Review Of Research Journal

Chief Editors

**Ashok Yakkaldevi**
**A R Burla College, India**

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

**Welcome to Review Of Research**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2249-894X**

Review Of Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## *Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Fabricio Moraes de AlmeidaFederal
University of Rondonia, Brazil

Catalina Neculai
University of Coventry, UK

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Horia Patrascu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Xiaohua Yang
University of San Francisco, San Francisco

Karina Xavier
Massachusetts Institute of Technology (MIT), USA

May Hongmei Gao
Kennesaw State University, USA

Marc Fetscherin
Rollins College, USA

Liu Chen
Beijing Foreign Studies University, China

Mabel Miao
Center for China and Globalization, China

Ruth Wolf
University Walla, Israel

Jie Hao
University of Sydney, Australia

Pei-Shan Kao Andrea
University of Essex, United Kingdom

Osmar Siena
Brazil

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Ilie Pintea
Spiru Haret University, Romania

Mahdi Moharrampour
Islamic Azad University buinzahra Branch, Qazvin, Iran

Titus Pop
PhD, Partium Christian University, Oradea,
Romania

J. K. VIJAYAKUMAR
King Abdullah University of Science & Technology,Saudi Arabia.

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences
Al. I. Cuza University, Iasi

REZA KAFIPOUR
Shiraz University of Medical Sciences
Shiraz, Iran

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

Nimita Khanna
Director, Isara Institute of Management, New Delhi

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

P. Malyadri
Government Degree College, Tandur, A.P.

S. D. Sindkhedkar
PSGVP Mandal's Arts, Science and Commerce College, Shahada [ M.S. ]

Anurag Misra
DBS College, Kanpur

C. D. Balaji
Panimalar Engineering College, Chennai

Bhavana vivek patole
PhD, Elphinstone college mumbai-32

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut (U.P.)

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Sonal Singh
Vikram University, Ujjain

Jayashree Patil-Dake
MBA Department of Badruka College Commerce and Arts Post Graduate Centre (BCCAPGC),Kachiguda, Hyderabad

Maj. Dr. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

AR. SARAVANAKUMARALAGAPPA
UNIVERSITY, KARAIKUDI,TN

V.MAHALAKSHMI
Dean, Panimalar Engineering College

S.KANNAN
Ph.D , Annamalai University

Kanwar Dinesh Singh
Dept.English, Government Postgraduate College , solan

More.........

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.net**

*Review Of Research*
Vol.2, Issue.3, Dec. 2012
**ISSN:-2249-894X** Available online at www.reviewofresearch.net

ORIGINAL ARTICLE

# 1980 नंतरची दलित कविता : एक आकलन

**संभाजी मलघे**

इंद्रायणी महाविद्यालय,
तळेगाव दाभाडे

**प्रस्तावना :—**

1980 नंतरच्या कालखंडात सुमारे साडेपाचशेच्या असपास दलित काव्यसंग्रह प्रकाशित झालेले आहेत. आणि हे विपुल लेखन दलित साहित्याचे यश दर्शवणारे आहेत. सदर लेखात यातील महत्त्वाच्या कवितेचा विचार केला आहे.

**लोकनाथ यशवंत :—**

'आता होऊन जाऊ द्या' (1989) 'आणि शेवटी काय झाले' (1996) व 'पुन्हा चाल करु या' (2009) हे तीन काव्यसंग्रह त्यांचे प्रकाशित झाले. यशवंतांच्या कवितेने दलित कवितेत साचलेपणा वा तोचतो पणा येतो हे विधान साफ मोडीत काढले. आशय अभिव्यक्तीपासूनच त्यांची कविता वेगळी ठरते.

आजही समाजात अस्पृश्यतेची जाणीव जागोजागी प्रत्येयाला येते यादृष्टीने यशवंतांची 'भीमराव मेश्रामची कविता' ही कविता उल्लेखनिय आहे. भीमराव मेश्राम हे दलित समाजाचे प्रातिनिधक रुप व संध्या देशपांडे हे सवर्ण समाजाचे प्रातिजनधिक रुप यांच्या माध्यमातून दोन भिन्न जातींमधला सनातन झगडा प्रत्येयास येतो—

तिचा बाप भाऊ खाली ढोलमी
हाफ पॅट घालून बाहेर जायला निघाले की
संध्या देशपांडे शंकरजीच्या पिंडीवरील
लिंगाची पूजा करीत असते

मी प्यायला पाणी मागतो तेव्हा ती वेगळयाच
ग्लासात पाणी देते आणि चटकन धुवायला टाकते
हा प्रश्न मला नेहमीच असतो
मी जायला निघतो तेव्हा संध्या स्वतःच्या
ओठांवरुन जीभ फिरवित असते
धुवायला टाकलेल्या काचेच्या गलासाचं
तिच्या जीभ फिरविणाऱ्या ओठाचं कोडं
मला आतापर्यंत उतगडलेलं नाही— (आता होऊन जाऊ द्या)
रक्तात भिनलेली अस्पृश्यतेची जाणीव या कवितेतून व्यक्त होते.

यशवंताच्या कविता शोशणाचा इतिहास, वर्णव्यवस्थेचे स्वरुप, माणसाला पशुपातळीवर जगायला भाग पडणारी तत्वज्ञाने इत्यादींवर भाश्य करते. आंबेडकरी विचारधारेला वेगळे वळण लावण्याचा देखीव आजकाल प्रयत्न होतो आहे इथली व्यवस्था महारोग्यासारखी सडलेली आहे हे सूचित करताने ते म्हणतात—

क्रुद्ध समूहातील एक संथ पावलांनी समोर आला
आणि अल्प श्रमाने त्याने माझे
दिशा दाखविणारे बोटच तेवढे तोडले (डॉ. भीमराव रामजी आंबेडकर)

हजारोवर्शापासून शोशित म्हणून दलित समाजाने वेदना, दु:ख भोगले पण आता विद्राह केला पाहिजे हे सांगताना यशवंत लिहितात–

अनेक दिवसांपासून गपच बसलेल्या
संतप्त जनाचा समूह जेव्हा रस्त्यावर येतो
तेव्हा निरर्थक पडलेले दगड शस्त्र बनतात
तुमच्याप्रमाणे मलाही हे शस्त्र महत्त्वाचे वाटते (शस्त्राच्या कविता)
लोकनाथ यशवंत यांची कविता दलित कवितेमध्ये वेगळेपण दर्शविणारी अशी आहे.

**अरुण काळे :–**

'रॉक गार्डन' (1993), 'सायरनचे शहर' (1997), 'नंतर आलेले लोक' (2006), 'ग्लोबलचं गावकूस' (2008) इत्यादी कवितासंग्रह प्रकाशित आहेत. 'रॉक गार्डन' मध्ये सांस्कृतिक जमीनीवरील दगडी भागेतील म्हणजेच या मातीतीच काळोखी पिकांच्या अनर्थाचे मूळ शोधण्याचा प्रयत्न केला आहे'. 'सायरनेचे शहर' या काव्यसंग्रहातून धर्म, जात, पंथ यांनी वाढलेले आणि गिधाडांचे साम्राज्य माजलेल्या शहराच्या मुक्या वेदना व्यक्त होतात.1 धर्माच्या नावाखाली शहरात माजणाऱ्या दंगली, माणसांचे स्वप्न झालेले जगणे व्यक्त होते.

अर्धशिशीसारखे सकाळी उठणारे
रात्री दोन घास निवांत खाणारे
मौजमजेत जगणारे हे शहर
काल इथं कली शिरला माणसात
माय लेकरं एकमेकांना धरीनात

'माणूस : एक नैसर्गिक प्रतिक्रिया' या दीर्घ कवितेत माणसाची विविध रुपे साकारली आहेत. संस्कृतिचा शिल्पकार आणि विकृतिचाही निर्माता, विध्वंसक, माणसाची महानता, दलित माणसाची अंधश्रद्धाळू वृत्ती याशिवाय त्यांची 'रमाई' 'श्रदधांजली' इत्यादीसारख्या अनेक कविता अंतर्मुख करायला लावणाऱ्या आहेत. रमाई कवितेत हे म्हणतात.

भौतिक जगाच्या सुखाच्या भिंती ओलांडून
स्त्री मुक्तीच्या उद्‌गात्याची पाठराखीण
किती एकरुप होऊन
अंग चोरून बसलीस त्या फोटोतही
बुद्ध स्त्री सारखी, शांतपणे
म्हणूनच आज मुक्त स्त्रिया भिंतीला खेटल्याप्रमाणे बसतात
बस, रेल्वेत, सार्वजनिक जीवन व्यवहारात स्वच्छ मनाने
मुक्त वाढीचा मंत्र मिळाला
तू हा स्त्रोत वाढविला
स्वत:चा जीवनरस सिंचून (सायरनच्या शहरात)

डॉ. बाबासाहेबांच्या पाठीशी खंबीरपणे उभ्या राहणाऱ्या रमाईचे रुप अत्यंत प्रपत्रिपणे साकार होते. जागतिकीकरणावर भाश्य करणारी त्यांची एक कविता येथे उल्लेखनिय ठरावी.

अरुण काळेंची कविता दलित कवितेत आशय अभिव्यक्ती आणि सर्व काही नवीन सांगून जाणारी कविता आहे उपरोध उपहास आणि वास्वाला भिडण्याचे सामर्थ त्यांच्या कवितेते आहे असे म्हणता येईल.

**भुजंग मेश्राम :–**

1990 साली 'ऊलगुलान' हा मेश्रामांचा काव्यसंग्रह प्रकाशित झाला. प्रास्तापित समाजव्यवस्थेतील अन्याय, अत्याचार, रूढी परंपरा यांना ठामपणे नकार देऊन गावकुसाबाहेरील खितपत पडलेल्या आदिवासी समाजीवनाचे समुहगान म्हणून 'ऊलगुलान' या काव्यसंग्रहाची नोंद घेता येईल.

आदिवासीं विमुक्त भटके यांना समाजाने गुन्हेगार ठरवले. त्यांच्यावर हा कायमचा शिक्का मारला गेला. जन्मभर भटकंती वाटयाला आलेल्या या माणसांचे दु:ख अत्यंत दाहक आहे.

आमच्या सामर्थ्याने गाणे झाडे बोलली, वारा बोलला
हे कळले रानात आलेल्या पाववाल्या गायकीना
मग त्यांनी फोडाला पाला अन् केली मशाल
कित्येक वर्षे त्यानंतर हे अरण्य जळत राहिले अखंड
तेव्हापासून आम्ही जमिनीत राहिलो अखंड (ऊलगुलान)

देशाला स्वातंत्र्य मिळाले वाटले होते आतातरी भटकंती संपेल पण हे स्वप्न व्यर्थ ठरले

लोकशाईचं हे देवूळ अहिंसेच्या नवसाले पावते सांगतात
फकस्त दुधाचं ताकावर येऊ शकते उपवादात!
त्यांनी कुळ मागीतले, भेटली नवाटी

आम्ही मुक्ती मागीतली, भेटली विमुक्ती
आता आमचं काही एक मागणं नाही!

आदिवासी समाजाचे आदिगात जाणारे मेश्रामांची कविता अधिक सजग आहे.

**वाहरू सोनावणे :–**

दलित कवितेतील आणखी एक महत्त्वाची नाव वाहरू सोनावणे. 1987 साली त्यांचा 'गोधड' हा काव्यसंग्रह प्रकाशित झाला. 'गोधड' ही ठिगळा ठिगळाची बनलेली असते. गावकुसाबाहेर राहणाऱ्या दलित माणसाचे जीवन हे गोधडीसारखे फाटक्या फाटक्या ठिगणांना टाके घालून ते जगत असतात परंतु प्रस्तावित समाजव्यवस्थेला अशा दुःखी, फाटक्या जगण्याचे काही घेणे देणं नाही, दलित आदिवासी समाज या समाजव्यवस्थेचा एक भाग असून तो रानावनात भटकत राहिला. जगण्याशी सतत झगडत राहिला या समाजाचे दुःख सोनावणे आपल्या कवितेतून मांडतात.

आमचे दुःख आमचेच राहिले
कधीच त्यांचे झाले नाही
आमची शंका आम्ही कुजबुजलो
ते कान खकारून ऐकत राहिले
नि सुस्कारा सोडला
आमचेच कान धरून आम्हालाच
दम भरता, माफी मागा नाही तर

आदिवासींच्या वाटयाला येणारे दुःख, न्याय, हक्कांसाठी त्यांची होणारी ससेहोळपट 'नक्षलवादी' म्हणून होणारा छळ इत्यादींचे अत्यंत वास्तव चित्रण सोनावणे यांच्या कवितेतून येते.

**लहू कानडे –**

लहू कानडे यांचा क्रांतीपर्व (1983) टाचाटिभा (1996) हे काव्यसंग्रह प्रकाशित झाले. चर्मकार समाजाचे दुःख कानडे यांनी आपल्या कवितेतून मांडले आहे 'चामडयाला कातडयाचा सळ घालून शिवणे म्हणजे 'टाचारिभा'2

चर्मकार समाजाच्या वाटयाला आलेले कश्ट, दारिद्रय व्यक्त करणारी कानडे यांची 'माय' ही कविता उल्लेखनिय आहे.

आठवणी चिंध्याचिंध्या झालेल्या
मी घालतो आहे टाका
जणू जखमेवर साय
शिवत असायची इरलेलं जुनेर
एकुलतं एक अंधारात
अर्धनागडी बसून माझी माय (टाचाटिभा)

दुःख, जगण्याशी तडजोड करीत आयुश्य घालवणे या जगण्याचे कानडेना असह्य वाटू लागते–

असंख्य तडजोडी आणि
मुखवटयांचा अखंड भार
माझ्यातून माणूसच झाला रिता
आता येत नाही
पहिल्या सारखी छाताड फोडून एखादी कविता ( टाचाटिभा)

कानडयांच्या कवितेविशयी महेंद्र भवरे म्हणतात ''जातीव्यवस्थेच्या आवतीत सापडलेल्या समूहजीवनाची, जातीव्यवस्थेचे दिलेल्या अटळ दुःखाची कहाणी 'टाचाटिभा' अधोरेखित करते.''3

**दीपक त्रिभुवन –**

दीपक त्रिभुवन यांचे खोल खदानी (1992) व 'माणसाचा जनक आणि इतर कविता (1996) हे काव्यसंग्रह प्रकाशित आहेत

आहेरे आणि नाहिरे यांच्यातील सनातन संघर्श टिपताना त्रिभुवन लिहतात–

शतकाच्या पोडपाडी अस्मितेनंतरही
आकारलेय हाडामासाचे जाणीवगर्भ
अजस्त्र लाटा उजेडानं लदबदलेल्या विध्वंसकाच्या
हिंस्त्र होऊन उफाळताहेत काळीज बोक्यातून
तुडवताहेत नकटया परंपरेची मढी दारात
जुलुमाच्या खोऱ्यात
उतमातलाय स्वातंत्र्याचा आविश्कार

या प्रचंड वस्त्र पसाऱ्यात फाटलाय कागदासारखा कंठ
भेसूरपणे शब्दबद्ध होतय
जळक्या अरण्याच्या छातीत वेदनांकन (खोल खदानी)
त्रिभुवन यांची कविता दलित कवितेत महत्त्वाची ठरावी.

1980 नंतरच्या दलित कवितेमध्ये माधव सरकुंडे यांचा 'मनोगत' जावेद कुरेशी यांचा 'बएत' (1997) उत्तम अंभोरे यांचे कसे जगावे कसे वागावे' (1994) 'पत्ता बदलत जाणारा' गनीम (2000), लक्ष्मण माने यांचा क्रांतिपथ (2007), उत्तम कांबळे, जागतिकीकरणात माझाी कविता' (2006), शरणकुमार लिबांळे यांचा उत्पात (1982) आणि 'श्वेतपत्रिका (1989) हे काव्यसंग्रह त्याचबरोबर कवयत्रिंमध्ये हिरा बनसोडे, यांचे पौर्णिमा (1970) फिर्याद (1984), मलिका अमर शेख यांचे वाळूचा प्रियकर (1979), देहऋतू (1999) महानगर (1999), प्रज्ञा पवार यांचे अंतःस्थ उत्कट जीवघेण्या धगीवर (2002) 'मी भिडवू पाहतेय समग्राशी डोळा (2007) कुमोद पावडे इत्यादी कवीचे काव्यलेखन वैशिश्टयपूर्ण आहे.

याशिवाय किशोर राजाराम घोरपडे यांचा दलदल (1990), वामनराव जगताप यांचे छेदचक्र (1990), वादळवारा (1992), अंतः स्फोट (1994) खदखद (1994) अग्निदिव्य (1995) दुभंगलेल्यांचे अभंग (1996), प्रतिबिंब (2009) प्रतिक्रिया (2003) भयानक (2004) प्रतारणा (2004) इत्यादी काव्यागृह प्रकाशित आहे. दिगंबर रामजी वाघमारे यांचा 'वादळ आणि फुले' (1991), रोहिदास वाघमारे यांचे स्पांदन (1991), सोनकळी (1996) सदाफुली (1998), तुकाराम खिल्लारे यांचे 'मुका फकीर' (1991) निळया हिरव्या तळयात (1999), 'पोळा (1999) इ. जगन्नाथ कांबळे यांचे 'उध्वस्त (1991) व 'ज्वालामुखी' (1995), संध्या रंगारी यांचा 'आघात' (1992), काशिनाथ सांडू वेलदोडे यांचा 'घुसमट' (1993), नागोराव उतरकर यांचा 'झोपडीच्या कविता' (1993), अशोक नाईक 'चळवळ' (1993), विनायक तुकाराम ढवळे यांचा 'शोधमुद्रा' (1994), राजेंद्र कांबळे यांचा 'फेरफार' (1994), सुर्यकांत दादा गरुड यांचा 'मोतीचारा' (1995), अशोक महाजन कोल्हे यांचा 'फैर' (1995), बलभीम तरकसे यांचे 'तरंगिणी' (1996), प्रतिशोध (2003), वारस (1986), नागनाथ कलबले झोपडी (1996), कमल कदम यांचा 'जाब' (1995), को. जो नरवाडे यांचे 'याय' (1996), प्रतिभा भरत अहिरे – 'मला हवी असणारी पहाट (1997) युगाचे हुंदके (1997), प्रकाश मोगले – 'दंभस्फोट' (1998), अनुरत्न वाघमारे 'चीतपट' (1999), 'माझ्या नजरेतून बाबसाहेब' (2001), प्रेरणा व्यवहारे – वर्तुळ (2000) शेशराव नाईकवाडे – 'शोध घेण्या निघालो' (2000) नारायण येवले–धार्मिक (1995), माणुसकी (2000) हरिभाऊ विराजी गायकवाड–मातंगा (2001), कैलास भले 'पोळणाऱ्या सावल्या (2001), ना. तु. पोघे आणि 'सूर्य गवसला' (2001) इत्यादी अनेक कवी काव्यलेखन करताना दिसतात.

**समारोप :–**

1980 नंतरच्या दलित कवितेचे स्वरूप वरील प्रमाणे लक्षात घेतले आहे. अशय, अभिव्यक्ति याबाबतीत वेगळेपण दर्शविणारी कविता आहे. मराठी कवितेत या कालखंडातील कविंचे योगदान मोलाचे ठरावे.

**संदर्भ :–**

1. महेंद्र भवरे, दलित कवितेतील नवे प्रवाह, शब्दालय प्रकाशन प्र. 2001
2. मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड साहवा भाग 211 (1950 ते 2000) म. सात्र पुणे, संपा. रा. ग. जाधव, काव्य नीलिमा गुंडी
3. महेंद्र भवरे दलित कवितेतील नवे प्रवाह, शब्दालय प्रकाशन प्र. 2001
4. तत्रैव
5. भालचंद्र फडके, दलित साहित्य वेदना व विद्रोह प्र. आ. 1977

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished research paper.Summary of Research Project,Theses,Books and Books Review of publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium Scientific
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- DOAJ
- EBSCO
- Crossref DOI
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Review Of Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.net